# प्रेस नोट दि -०४/०१/२०२५

## सोलापुर रोडवरील गोळीबार मैदान चौक ते रविदर्शन चौक दरम्यान होत असलेली वाहतुक कोंडी रस्त्यांचे व चौकांचे सुधारणांमुळे सुटलेबाबत

वानवडी वाहतुक विभागा अंतर्गत पुणे सोलापुर हायवे क्रं ६५ येत असुन वानवडी व हडपसर वाहतुक विभागाचे हद्दीमधिल गोळीबार मैदान चौक ते रविदर्शन दरम्यान दररोज सकाळी,दुपारी व सायंकाळी अरुंद रस्ते, रस्त्यावर खड्डे तसेच काही चौकात विनाकारण लेफ्ट टर्न, राईट टर्न, यु टर्न यामुळे दररोज पुणे सोलापुर रोडला वाहतुकीची कोंडी होवुन वाहतुकीचा वेग मंदावला होता.त्यामुळे मा श्री अमितेश कुमार, (पोलीस आयुक्त पुणे शहर),मा. श्री रंजनकुमार शर्मा (सह.पोलीस आयुक्त पुणे शहर) मा. श्री मनोज पाटील (अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर) व मा. श्री अमोल झेंडे (पोलीस उप - आयुक्त वाहतुक शाखा पुणे शहर) यांचे मार्गदर्शनाखाली व.पो्.नि. सुनिल पंधरकर वानवडी वाहतुक विभाग पुणे शहर, वपोनि धनंजय पिंगळे हडपसर वाहतुक विभाग पुणे शहर यांनी पुणे म न पा अधिकारी श्री अनिरुद्ध पावसकर, (मुख्य अभियंता पथ विभाग) श्री निखील निजार (वाहतुक नियोजक) तसेच मेटा आर्च प्रा.ली. कंपनीचे मॅनेजीग डायरेक्टर श्री मिलींद रोडे यांचे मदतीने माहे ऑगस्ट २०२४ पासुन ते आजपावेतो खालीलप्रमाणे चौकात व सोलापुर रोडवर सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

### १. रामटेकडी चौक

- सदर चौकात वैदवाडी ते रामटेकडी चौक दरम्यान असलेले डिव्हाडर काढुन रस्ता रुंद करण्यात आलेला असुन रस्त्याचे मधोमध नव्याने डिव्हाडर टाकण्यात आलेला आहे.
- तसेच रस्त्यामध्ये येणारे बस स्टॉप रस्त्याचे कडेला शिप्ट करण्यात आलेले आहे. तसेच सिग्नलचे पोल, इलेक्ट्रिक पोल, डिव्हाडर व फुटपाथवर शिप्ट करण्यात आलेले आहे.
- एस.आर.पी.एफ.कडे जाताना रस्त्यावर कॉर्नरला असलेली इलेट्रिक डी.पी. काढुन मागे शिप्ट करण्यात आलेली आहे.
- रामटेकडी चौक ते ए.आय. पी .टी गेट पर्यतचा रस्ता रुंदीकरण करण्यात आलेला आहे. व त्यावरील ए.आय.पी.टी.बस स्टॉप मागे घेवुन रस्ता रुंद करण्यात आलेला आहे.तसेच रामटेकडी चौकापासुन वैदवाडीकडे जाताना असलेला रस्ता रुंद करण्यात आलेला आहे
- .तसेच चौकातील अण्णाभाऊ साठे यांचे नावाचा बोर्ड रस्त्याचे मधोमध डिव्हाडर जवळ लावलेला होता. सदरचा बोर्ड काढुन रस्त्याचे कडेला फुटपाथवर सुशोभीकरण करुन नवीन बोर्ड बसवण्यात आला आहे.
- चौकातील खड्डे बुजवुन चौकाचे रोड सर्फेसिंग करुन रस्ता खड्डे विरहित केला आहे.

## काम करण्या अगोदर








## कामानंतरचे फोटो











## २. काळुबाई चौक -

- सदर चौकात संपुर्ण रस्तावरील चौकाचे रोड सरफेसींग करण्यात येवुन रस्त्यावरील खड्डे बुजवुन रोड सुस्थितीत करण्यात आलेला आहे.

## ३.सोपानबाग चौक -

- सोपानबाग चौक ते काळुबाई चौक दरम्यान असलेला रोडवरील डिव्हाडर काढण्यात आलेला असुन रस्त्याचे मधोमध डिव्हाडर टाकुन रस्ता रुंदीकरण करण्यात आलेला आहे.
- बस स्टॉप रस्त्याचे कडेला शिप्ट करण्यात आलेला आहे.
- सोपानबाग चौकाकडुन रामटेकडी चौकाकडे जाताना सोपानबाग चौक ते काळुबाई चौक दरम्यान असलेला रस्ता रुंदीकरण करण्यात आलेला आहे.
- फातीमानगर चौकाकडुन येवुन शिवरकर रोडला जाणा-या वाहनांना नव्याने यु टर्न देण्यात आलेला आहे. तसेच ९३ एव्हेन्यु मॉल जवळील यु - टर्न ते इंडीयन खिश्चन सिमेट्री गेट दफन भुमी रस्ता रुंद करण्यात आलेला आहे. त्यावरील इलेक्ट्रिक पोल शिप्ट करण्यात आलेले आहेत .
- सध्या प्रायोगिक तत्त्वावर सोलापुर कडुन पुणे कडे जाण्यासाठी वाहनांना स्ट्रेट कंटिन्यु सिग्नल चालु ठेवण्यात आलेला आहे त्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुक कोंडी कमी होवुन वाहतुक वेगाने व सुरळित चालु आहे.
- कॅन्टीलिव्हर सिग्नल नव्याने बसविण्यात आले आहे.

## काम करण्या अगोदर












## कामानंतरचे फोटो









## ४.फातीमानगर चौक

- पुणे सोलापुर रोडवरील फातीमानगर जंक्शन बंद करुन चौकीतील राईट टर्न, लेफ्ट टर्न प्रायोगिक तत्वावर बंद करण्यात येवुन शिवरकर रोडवरुन येणारी वाहतुकीस भैराबानाला चौकातुन यु - टर्न देण्यात आलेला आहे.
- भैरोबानालाकडुन येवुन शिवरकर रोडला जाणा-या वाहनांना ९३ एव्हेन्यु मॉल येथुन जाण्यास यु - टर्न देण्यात आलेला आहे.
- डिव्हाडर रस्त्याचे मधोमध शिफ्ट करण्यात आलेला आहे.सदर चौकातील खड्डे बूजवुन रस्ता सुस्थितीत करण्यात आलेला आहे.तसेच हडपसरचे दिशेने जाताना चौकाचे पुढे असलेला खड्डा भरुन रिटेनिंग वॉल टाकण्याचे काम प्रगती पथावर सुरु करुन रस्ता रुंदीकरण करण्याचे काम चालु आहे.सदरबाबत जागामालक श्री बाळासाहेब शिवरकर यांचे मदतीने जागा ताब्यात घेवुन सदरचे काम सुरु करुन रस्ता रुंद करण्यात येत आहे.

## काम करण्या अगोदर








## कामानंतरचे फोटो











## ५.भैरोबानाला चौक

- सदर चौकात डिव्हाडर शिप्ट करुन शिवरकर रोडवरुन येणा-या वाहनांना यु टर्न देण्यात आलेला आहे
- डिव्हाडर मध्ये असलेले इलेक्ट्रिक पोल शिप्ट करण्यात आलेले आहेत.
- फातीमानगर चौक ते भैरोबानाला चौक दरम्यान रस्ता रुंदीकरण करण्यात आलेला आहे.
- लुल्लानगर कडुन येताना भैरोबानाला चौकीच्या पुढील कॉर्नरचा रस्ता रुंदीकरण  करुन सेप्रेट लेन तयार करण्यात आली आहे.
- भैरोबानाला वाय जंक्शन जवळील झाडे -झुडपे कमी करण्यात आलेली आहे.तसेच इम्प्रेस गार्डन कडुन येवुन वानवडी बाजार चौकीकडे जाणा-या बसेसला अडथळा करणारी झाडांच्या दोन फांदया काढुन घेण्यात आलेल्या आहे.

**काम करण्या अगोदर**















**कामानंतरचे फोटो**













## ६.मम्मादेवी चौक

- सदर चौकाचे पुढे असलेले ५ इलेट्रिक पोल हे रस्त्यावर होते ते रस्त्याचे कडेला शिप्ट करुन रस्ता रुंदीकरण करुन इलेक्ट्रिक पोल फुटपाथचे कडेला घेण्यात आलेले आहे.

- मम्मादेवी चौकात पेट्रोल पंपाजवळील कॉर्नरला रस्त्याचा बॉटलनेक कमी करुन रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे.
- सदर चौकात नव्याने कॅन्टीलिव्हर सिग्नल पोल टाकण्यात येत आहे.

**काम करण्या अगोदर**







**काम केल्यानंतर**
















**७.गोळीबार मैदान चौक**

- स्वारगेट कडुन येणा-या वाहनांना लेफ्ट टर्न फ्री देण्यात आलेला आहे. त्यासाठी सेपरेट बॅरीकेट लेन तयार करण्यात आलेली आहे
- .गोळीबार चौक ते धोबीगाठ दरम्यान डिव्हाडर टाकण्यासाठी म न. पा यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.त्याचा पाठपुरावा करुन नव्याने डिव्हाडर बसवुन घेत आहोत.

- सोलापुर कडुन येणा-या वाहनांना गोळीबार चौकातुन लेफ्ट टर्न बंद व स्वारगेट कडुन सी डी ओ कडे जाणा-या वाहनांना राईट टर्न बंद करण्यात आलेला आहे. आहे. त्यामुळे गोळीबार चौकात वाहतुक सुरळित आहे.
- गोळीबार चौकातील रस्त्याचे डांबरीकरण करुन खड्डे बूजवुन रस्ता सुस्थितीत केल्याने वाहतुक वेगाने व विना कोंडी सुरु आहे.

<table>
<tr><td colspan="2">काम करण्या अगोदर</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="2">कामानंतरचे फोटो</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
</table>



## ८.रामटेकडी ओव्हरब्रिज

- रामटेकडी ओव्हरब्रिज वर असलेला पादचारी भुयारी मार्ग होता. तो काढुन रस्ता रंदीकरण करण्यात आलेले आहे.

| कामाचे आधीचे फोटो | कामानंतरचे फोटो |
|---|---|
|  |  |

## ९. वैदवाडी चौक -

- सदर चौकात किर्लोस्कर ब्रिज ते मगरपट्टा चौक दरम्यान असलेले डिव्हाडर काढुन रस्ता रुंद करण्यात आलेला असुन रस्त्याचे मधोमध नव्याने डिव्हाडर टाकण्यात आलेला आहे.
- तसेच रोडवरील असलेले  बस स्टॉप चौकाचे पाठीमागे शिफ्ट केलेले आहे.
- सध्या प्रायोगिक तत्त्वावर हडपसर इंडस्ट्रियल कडुन पुण्याकडे जाणा-या वाहनांसाठी राईट टर्न बंद केला आहे. वाहतुक मगरपट्टा चौकाकडे वळविण्यात आलेली आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुक कोंडी कमी होवुन वाहतुक वेगाने व सुरळित चालु आहे.
- तसेच सिग्नलचे पोल, इलेक्ट्रिक पोल, डिव्हाडर व फुटपाथवर शिप्ट करण्यात आलेले आहे.
- किर्लोस्कर ब्रिज ते वैदवाडी पर्यतचा रस्ता रुंदीकरण करण्यात आलेला आहे.

| कामानंतरचे फोटो | |
|---|---|
|  |  |

## ११. मगरपट्टा चौक

- सदर चौकात संपुर्ण रस्तावरील चौकाचे रोड सरफेसींग करण्यात येवुन रस्त्यावरील खड्डे बुजवुन रोड सुस्थितीत करण्यात आलेला आहे.
- सदर चौकात मगरपट्टा चौक दरम्यान असलेले डिव्हाडर काढुन रस्ता रुंद करण्यात आलेला असुन रस्त्याचे मधोमध नव्याने डिव्हाडर टाकण्यात आलेला आहे.
- तसेच रस्त्याचे मधे असलेले  बस स्टॉप चौकाचे बाजुला शिफ्ट केलेले आहेत. परंतु सदर चौकातील पीएमपीएमएल बस स्टॉप हा सिग्नल जवळच पीएमपीएमएल ने शिफ्ट केला असल्याने वाहतुकीस अडथळा होत आहे त्यामुळे सदर बाबत पीएमपीएमएल व्यवस्थापक यांचेशी पत्र व्यवहार केलेला आहे.

| कामानंतरचे फोटो | |
|---|---|
|  |  |

## ११.हडपसर वेस चौक

- मगरपट्टा चौक ते हडरसर वेस दरम्यान फुटपाथ कमी करुन रस्ता रुंदीकरण करण्यात आलेला आहे.
- हडपसर वेस ,माळवाडी जंक्शन, मंत्री मार्केट या ठिकाणी वाहतुकीस अडथळा करणारी अतिक्रमणे काढुन घेण्यात आलेली आहे तसेच फुटपाथ वरील पथारी व्यावसायिक काढुन घेण्यात आलेले आहे.

## १२ गाडीतळ चौक

- सदर चौकातील रिक्षा स्टॅड बंद करण्यात आला आहे. त्यामुळे रस्ता रुंदीकरण होवुन वाहतुक कोंडी कमी झाली आहे.

## १३ रविदर्शन चौक

- सदर चौकातील रविदर्शन समोरील सर्व्हिस रस्ता व मुख्य रास्ता यांचे मध्ये स्टॉम वॉटर लाईन रस्त्यापासून १ फुट उंच होती. सदर स्टॉम वॉटर लाईन कढून सर्व्हिस रस्ता व मुख्य रस्ता सर्फेसिंग केला आहे. सदर स्टॉम वॉटर लाईनवरील पी.एम.टी. बस स्टॉप व एस.टी. बस स्टॉप हे सर्व्हिस रोच्या कडेला स्थलांतरीत केले आहेत. चौकातील लक्झरी बस स्टॉप हा पी.एम.टी. डेपो शेवाळवाडी येथे स्थलांतरीत केला आहे.
- रविदर्शन चौक ते १५ नंबर चौक दरम्यान रोड दुभाजका वरील झाडे -झुडपे कमी करण्यात आलेली आहे.
- चौकाचे बाजुला असलेली अतिक्रमणे मनपा कडून काढण्यात आलेली आहे.
- रविदर्शन चौकात पावसाचे पाणी साटलाने वाहतुक कोंडी होत होती. सदर चौकात पावसाळी चेंबरची संख्या वाढविली आहे. तसेच पावसामुळे पडलेले चौकातखड्डे बुजविण्यात आलेले आहे.

**कामानंतरचे फोटो**



## १४. पंधरा नंबर चौक

- रविदर्शन चौक ते १५ नंबर चौक दरम्यान रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे. सदर चौकातील रोड सरफेज करण्यात आलेला आहे. पावसामुळे पडलेले खंडे बुजविले आहेत.
- चौकातील डीपी काढणेबाबत महाराष्ट्र राज्य विदुयत महामंडळ लि. शेवाळवाडी यांचेशी पत्रव्यवहार केलेला आहे.
- सोलापुर कडे जाणा-या बाजुने दुपारच्या वेळेस वाहतुक कोंडी होत असल्याने सोलापुरकडे जाणा-या बाजुच्या सिग्नलचा वेळ वाढविण्यात आला आहे. त्यामुळे वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत झाली आहे.
- मगरपट्टा ते १५ नंबर चौक दरम्यान रस्त्याचे कडेला थांबणारे खाजगी ट्रव्हॅल्स यांचे करीता शेवाळवाडी बस डेपो या ठिकाणी बस थांबा देण्यात आला आहे तसेच ट्रॅव्हल्स चालकांनी शेवाळवाडी येथे खाजगी बस थांबा तयार केला आहे तरी ट्रव्हॅल्स या सदर ठिकाणी प्रवासी घेण्याकरीता थांबत आहेत.

<table>
<tr><td colspan="2">कामाचे आधीचे फोटो</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="2">कामानंतरचे फोटो</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
</table>

## १५ लक्ष्मी कॉलनी चौक

- सदर चौकातील रस्त्याचे डांबरीकरण करुन खड्डे बूजवुन रस्ता सुस्थितीत केल्याने वाहतुक वेगाने व विना कोंडी सुरु आहे.
- तसेच चौकातील फुटपाथची रुंदी कमी करुन रोड रुंदीकरण करण्यात आलेले आहे.

वानवडी विभागाअंतर्गत फातीमानगर चौक बंद करण्याअगोदर व बंद केल्यानंतर वरीलप्रमाणे सोलापुर रोडवर सुधारणा केलेनंतर वाहतुकीचा वेग कसा वाढला आहे याबाबत ए. टी. एम. एस. स्मार्ट सिटी यांचेकडुन माहिती प्राप्त करुन घेतली आहे ती खालीलप्रमाणे.

**सोलापुर रोडवरील वाहनांचा सरासरी कॉरीडोअर स्पीड सकाळी ०६.०० ते रात्रौ २३.०० वा पर्यत स्मार्ट सिटी पुणे यांनी सीसीटीव्ही व्दारे माहे सप्टे, ऑक्टो, नोंव्हे व डिसेंबर २०२४ मधिल शेवटच्या ०४ दिवसांचा काढला असुन तो खालीलप्रमाणे वाढलेला दिसुन येत आहे.**

| **अपस्ट्रेम** | **स्वारगेट मे सेंट मेरी** | **सेंट मेरी ते सोपानबाग** | **सोपानबाग ते रविदर्शन** | **कॉरीडोअर ॲव्हरेज** |
|---|---|---|---|---|
| **सप्टे** | १८.४० | २५.०८ | २४.२९ | २३.९२ |
| **ऑक्टो** | १७.७६ | २५.४७ | २६.६१ | २३.३८ |
| **नोंव्हे** | २०.८४ | २७.४६ | २९.६२ | २५.९७ |
| **२६ डिसेंबर** | २१.२१ | २८.२८ | ३१.९४ | २७.१४ |
| **२७ डिसेंबर** | २०.४२ | २७.१९ | ३१.५८ | २६.४० |
| **२८ डिसेंबर** | २०.३९ | २६.९१ | ३०.३४ | २५.८८ |
| **२९ डिसेंबर** | २२.१० | २९.४५ | ३२.३० | २७.९५ |
| **डाउनस्ट्रेम** | **रविदर्शन ते सोपानबाग** | **सोपानबाग ते सेंट मेरी** | **सेंट मेरी ते स्वारगेट** | **कॉरीडोअर ॲव्हरेज** |
| **सप्टे** | २२.३२ | २१.६३ | १८.१६ | २०.७० |
| **ऑक्टो** | २२.६५ | २३.०२ | १८.१७ | २१.२८ |
| **नोंव्हे** | २३.७२ | २५.६९ | १९.९० | २३.११ |
| **२६ डिसेंबर** | २५.६१ | २७.३१ | २०.६१ | २४.५१ |
| **२७ डिसेंबर** | २५.४७ | २६.७८ | २०.३६ | २४.२० |
| **२८ डिसेंबर** | २४.७७ | २६.५५ | १९.२९ | २३.५७ |
| **२९ डिसेंबर** | २६.९५ | २९.५३ | २०.९१ | २५.७९ |

तरी वरील प्रमाणे पुणे सोलापुर क्रं ६५ यावर वरीलप्रमाणे नव्याने सुधारणा केल्याने तसेच आणखी काही सुधारणा चालु असुन रस्त्यावरील वाहतुक कोंडी सुटली असुन वाहतुक वेगाने व सुरळितपणे चालु झालेली आहे **सोलापुर रोडला सुधारणा केल्याने वाहतुकीचा वेग १५ ते २५ टक्के वाढलेला दिसुन येत आहे.**

तरी सदर वरील सुधारणाकरीता मा पोलीस आयुक्त पुणे शहर, मा सह पोलीस आयुक्त पुणे शहर, मा अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर मा पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. सुनिल पंधरकर वानवडी वाहतुक विभाग पुणे शहर, वपोनि धनंजय पिंगळे हडपसर वाहतुक विभाग पुणे शहर यांनी पुणे म न पा अधिकारी श्री अनिरुद्ध पावसकर, मुख्य अभियंता पथ विभाग, श्री साहेबराव दांडगे अधिक्षक अभियंता, श्री सुधीर चव्हाण कार्यकारी अभियंता श्री रुषीकेश सुर्यवंशी कनिष्ठ अभियंता श्री निखील निजार वाहतुक नियोजक तसेच मेटा आर्च प्रा.ली. कंपनीचे मॅनेजीग डायरेक्टर श्री मिलींद रोडे यांचे मदतीने वरील प्रमाणे पुणे सोलापुर रोडला सुधारणा केल्याणे वाहतुक कोंडी कमी झाली असुन वाहतुक सुरळीत, सुरक्षीत व वेगाने सुरु आहे.